# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
# छत्रपती संभाजीनगर

## स्वर्गीय शिक्षक आमदार वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार : आदर्श नियम

१. किमान पाच वर्षे कायम संलग्नताप्राप्त महाविद्यालयांनाच पुरस्कारासाठी अर्ज करता येईल. तसेच महाविद्यालयास कायमस्वरुपी मान्यताप्राप्त प्राचार्य असावा.
२. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पुरस्कारासाठीचा अर्ज संस्थेच्या अध्यक्ष/ सचिव यांच्यामार्फत विद्यापीठास सादर करावा.
३. दरवर्षी ०१ अनुदानित आणि ०१ विनाअनुदानित अशा एकूण ०२ महाविद्यालयांना सदर पुरस्कार दिला जाईल.
४. महाविद्यालयात सुरु असलेले अभ्यासक्रम व विद्यार्थीसंख्या शासन व विद्यापीठ मान्यताप्राप्त व प्रमाणित असावेत.
५. पुरस्कारप्राप्त महाविद्यालयांना पुढील दहा वर्षानंतरच पुनःश्च पुरस्कारासाठी अर्ज करता येईल.
६. महाविद्यालयात पुढील मुलभूत सुविधा असणे अनिवार्य आहे- स्वतःची जागा, इमारत, वर्ग खोल्या, क्रीडांगण, सुसज्ज प्रयोगशाळा, समृद्ध ग्रंथालय, प्रसाधनगृहे (विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र) व इतर सुविधा. महाविद्यालयात पुढील सुविधा असल्यास प्राधान्य- संशोधन केंद्र, उपाहारगृह, वसतिगृहे (विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र), कर्मचारी निवासस्थाने, आरोग्य सुविधा, इंटरनेट, बँकिंग सेवा, दूरध्वनी, वाहतूक सुविधा इत्यादी.
७. महाविद्यालयाची सांस्कृतिक, क्रीडाविषयक, राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.), राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C.), रोजगारविषयक उपक्रम व इतर क्षेत्रातील प्रगती.
८. महाविद्यालयाचे नॅककडून मूल्यांकन/ पुनर्मूल्यांकन झालेले असावे.
९. महाविद्यालयास शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व इतर मान्यताप्राप्त संस्थाकडून मिळालेल्या अनुदानाचा तपशील.
१०. महाविद्यालयाचे शैक्षणिक विकासात, सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमातील योगदान.
११. महाविद्यालयाची मागील पाच वर्षांची शैक्षणिक प्रगती- निकालाची टक्केवारी, गुणवत्ता यादीतील विद्यार्थी, शिक्षकांना मिळालेले पुरस्कार, प्रकल्प, पेटेंट इत्यादी.
१२. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य व विद्यापीठ स्तरावर महाविद्यालयाने यशस्वीरित्या आयोजित केलेले उपक्रम त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या वार्षिक महोत्सवाचे आयोजन करणाऱ्या महाविद्यालयांना प्राधान्य देण्यात येईल.
१३. महाविद्यालयाकडे विद्यापीठाचे कोणतेही देयक थकीत नसावे. महाविद्यालयास विद्यापीठाकडून कोणताही दंड झालेला नसावा. तसेच परीक्षा केंद्र विद्यापीठाकडून रद्द झालेले नसावे.
१४. महाविद्यालय स्वतः क्रीडा, सांस्कृतिक इ. महोत्सव / उपक्रम राबवित असेल.
१५. महाविद्यालयाचे हाऊस जर्नल/ संशोधन-पत्रिका असावे.
१६. महाविद्यालयाचे शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांचे कोणतेही तक्रार अर्ज विद्यापीठ तक्रार निवारण समितीकडे प्राप्त नसावेत.
१७. महाविद्यालयाशी संबंधित फौजदारी गुन्हा यासारख्या गंभीर बाबतीत गुन्हा सिध्द झालेला नसावा. तसे स्वयंघोषणापत्र स्वतंत्ररित्या प्रस्तावासोबत जोडावे.
१८. विद्यापीठाने पुरस्कारासाठी गठीत केलेली निवड समिती उपरोक्त मुद्यांचा विचार करून एका महाविद्यालयांची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करेल.
१९. कॉपीमुक्त अभियान कशाप्रकारे राबविले? याचा तपशील सादर करावा.
२०. विद्यापीठ प्रशासन व विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालनाचा अहवाल, गठीत केलेल्या समित्या यांचा अहवाल सादर करावा.
२१. पुरस्कार देणे हे विद्यापीठावर बंधनकारक असणार नाही.